# Positive Story of Nagpur Rural Police

## दिनांक ०८.०९.२०२५

### खुन करणाऱ्या आरोपीतांचा ४ तासात घेतला शोध,
### स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कुही :—** दिनांक ०७/०९/२०२५ रोजी मृतक नामे देवराव शामराव घरजाळे, वय ५६ वर्ष, रा. प्लॉट नं. ०६ शिवांगी नगर, बोरकर हॉस्पीटल समोर, नागपूर हे त्यांचे मो.सा. क्र. एमएच ४९ डब्लु ४८८९ ने मौजा कुसूंबी येथे जाण्याकरीता घरून एकटेच निघाले असता पोलीस स्टेशन कुही अंतर्गत उमरगाव ते पांढरकवडा रोडवरील टर्निंग जवळ कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणावरून त्यांच्या गळयावर तसेच संपुर्ण शरीरावर धारदार शस्त्राने वार करून जिवानिशी ठार मारले आहे अशा रिपोर्टवरून पोलीस स्टेशन कुही येथे खुनाचा गुन्हा नोंद होता.

आरोपी अज्ञात असल्याने मा. वरीष्ठ अधिकारी यांच्या मार्गदर्शनात कुही पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तात्काळ तपास सुरू केला. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कौशल्यपुर्ण तपास करून अवघ्या ४ तासात गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे नमुद गुन्हयात आरोपी नामे १) अंकित संजय येळणे, वय २६ वर्षे, रा. पिपळा, हुडकेश्वर २) आरोपी नामे मुक्तेश्वर ज्ञानेश्वर मेश्राम, वय ३८ वर्षे रा. दुबेनगर, पिंपळा, हुडकेश्वर नागपूर, ३) आरोपी नामे गजानन नामदेवराव कडू , वय ३८ वर्षे, रा. पिपळा हुडकेश्वर, ४) गणेश गंगाराम हुड, वय ३८ वर्षे, रा. दुधाळा तह. मौदा जि.नागपूर यांचा गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न केले. आरोपीतांना ताब्यात घेवुन विचारपुस केली असता आरोपी नामे अंकित संजय येळणे हा मृतकाचा नातेवाईक असुन त्याने प्रॉपर्टीच्या वादातुन त्याने त्याचा मित्र आरोपी नामे मुक्तेश्वर ज्ञानेश्वर मेश्राम याला सदर खुन करण्यासाठी सांगितले होते. अंकित येळणे याला माहीत होते की, दिनांक ०७/०९/२०२५ रोजी मृतक हे मौजा कुसूंबी येथे जाणार आहे. त्यामुळे त्याने आरोपी मुक्तेश्वर आणि गणेश हुड यांना

पोलीस स्टेशन कुही अंतर्गत उमरगाव ते पांढरकवडा रोडवरील टर्निंग जवळ नेवुन सोडले. मृतक नामे देवराव शामराव घरजाळे घराबाहेर पडल्याची माहीती गजानन नामदेव कडु याने आरोपीतांना दिली. मुक्तेश्वर आणि गणेश यांनी दिनांक ०७/९/२५ चे ०९.०० वा ते १०.०० वा धारदार चाकुने वार करून मृतकाचा खुन केल्याची माहीती प्राप्त झाली.



**स्थानिक गुन्हे शाखेचे पथक**

देशोन्नती

# प्रॉपर्टी डिलरच्या हत्येचा अवघ्या ४ तासांत पर्दाफाश

## ग्रामीण गुन्हे शाखा पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी

देशोन्नती वृत्तसंकलन

**नागपूर :** शहरातील प्रॉपर्टी डिलर देवराव श्यामराव घरजाळे (५५), रा. प्लॉट क्रमांक ६, शिवांगीनगर, हुडकेश्वर नागपूर, यांच्या हत्येचा ग्रामीण पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा पोलिसांनी अवघ्या ४ तासांत पर्दाफाश केला. याप्रकरणी पोलिसांनी मुख्य सूत्रधार मृतकाचा पुतण्यासह ४ आरोपींना अटक केली. जुने वैमनस्य व संपत्तीच्या वादातून आरोपी पुतण्यानेच दोन महिन्यांपूर्वी रचलेल्या प्लॅननुसार नातेवाईक सख्ख्या मावसाची हत्या केल्याचे समोर आले.



ही हत्येची सुपारी आरोपी मुख्य सूत्रधार पुतण्याने इतर आरोपींना २० लाखांत दिल्याचा संशय असल्याचे म्हटले जाते. ही हत्येची थरारक घटना कुही हद्दीत ७ सप्टेंबर रोजी घडली होती. प्रॉपर्टी डिलर देवराव घरजाळे यांचा मृतदेह उमरगाव पांढरकवडा रस्त्यावर आढळला. मृताच्या शरीरावर अनेक खोल जखमा असून गळा अर्धा कापला आहे. याप्रकरणी कुही पोलिस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला.

घटनेनंतर कुही पोलिस आणि ग्रामीण गुन्हे शाखेच्या पोलिसांनी संयुक्त तपास सुरू केला. ग्रामीण पोलिस अधीक्षक डॉ. हर्ष पोद्दार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि ग्रामीण गुन्हे शाखेचे प्रमुख वरिष्ठ पोलिस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ही कारवाई केली. गुन्हा दाखल झाल्यानंतर ४ तासांच्या आत पोलिस पथकाने हत्येचा पर्दाफाश केला आणि ४ आरोपींना अटक केली. अटक केलेल्या आरोपींमध्ये पुतण्या अंकित संजय येळणे (२६), रा. पिपळा, हुडकेश्वर, मुक्तेश्वर ज्ञानेश्वर मेश्राम (३८), रा. दुबेनगर, पिपळा, हुडकेश्वर, गजानन नामदेवराव कडू (३८), रा. पिपळा रोड, हुडकेश्वर आणि गणेश गंगाराम हुड (३८), रा.

### आरोपी रस्त्यात दबा धरून बसले होते

प्राप्त माहितीनुसार, ७ सप्टेंबर रोजी मृतक देवराव घरजाळे हे त्यांच्या मोटारसायकल क्रमांक एमएच ४९ डब्ल्यू - ४८८९ वर मौजा कुसुंभी येथे जाण्यासाठी एकटेच निघाले होते. ते घरी परतले नाहीत. या दरम्यान, कुही पोलिस ठाण्यांतर्गत येणाऱ्या उमरगाव-पांढरकवडा रस्त्यावरील वळणाजवळ अज्ञात आरोपीने त्यांच्या मानेवर आणि शरीरावर धारदार शस्त्राने वार करून त्यांची हत्या केल्याची माहिती पोलिसांना मिळाली. याप्रकरणी कुही पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल केला.

Nagpur Edition
Sep 09, 2025 Page No. 1
Powered by: erelego.com

■ ४ आरोपींना अटक, सूत्रधारामध्ये पुतण्याचा समावेश

■ प्रॉपर्टीचा वाद, २० लाखांची सुपारी दिल्याचा संशय

दुधाळा, मौदा नागपूर यांचा समावेश आहे. न्यायालयाने आरोपींना १२ सप्टेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली.

आरोपी गणेश हुडवर यापूर्वीसुद्धा हत्येचा गुन्हा दाखल असल्याचे सांगितले जाते. हुड आणि मेश्रामनेच हत्येची सुपारी घेतल्याची चर्चा आहे. प्राप्त माहितीनुसार, मृतक देवराव घरजाळे हे न्यू नागपूर महिला ग्रामीण विकास सहकारी पतसंस्थेच्या लिमिटेडमध्ये संस्था व्यवस्थापक होते. पेरकर, कालकर, दुधाणे, मोरेश्वर त्यांच्यासोबत भागीदारीत प्रॉपर्टी विक्रीचे काम करायचे. देवराव घरजाळे यांची हत्या सुपारी देऊन करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. यातील मुख्य सूत्रधार अंकित याचा मृतक देवराव हे सख्खे मावसा असून त्यांच्यात जुना प्रॉपर्टीचा वाद सुरू होता. आरोपी अंकीतच्या मते, त्याच्या वडिलांची दिशाभूल करून मृतक देवराव यांनी घर, शेती व पतसंस्थेवर ताबा घेतला आणि याच वादातून ही हत्येची घटना घडल्याची त्याने कबुली दिली. अटक केलेल्या चार आरोपींपैकी तिघे हुडकेश्वर परिसरातील आहेत.

आरोपी अज्ञात असल्याने पोलिसांसाठी हे मोठे आव्हान होते. पोलिस अधीक्षक डॉ. पोद्दार यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाची कारवाई सुरू करण्यात आली. गुप्त माहिती आणि तंत्रज्ञानाच्या आधारे ग्रामीण गुन्हे शाखेच्या पोलिस पथकाने ४ तासांत आरोपींचे धागेदोरे शोधून काढण्यात यश मिळविले.

---

नवभारत
www.navbharatlive.com

# प्रॉपर्टी विवाद में प्रॉपर्टी डीलर की हत्या

## 4 घंटे के भीतर LCB ने 4 आरोपियों को किया गिरफ्तार

■ नागपुर/कुही, संवाददाता. प्रॉपर्टी के विवाद के चलते नागपुर निवासी प्रॉपर्टी डीलर की कुही में धारदार हथियारों से वार



कर हत्या कर दी गई. घटना के बाद परिसर में खलबली मच गई. इसकी सूचना स्थानीय अपराध शाखा को मिलने पर घटना के महज 4 घंटों के भीतर ही चार आरोपियों को गिरफ्तार कर लिया गया. आरोपियों में मृतक का भतीजा भी शामिल है और जो इस हत्याकांड का मुख्य सूत्रधार भी बताया जा रहा है. घटना रविवार को उंबरगांव से पांढरकवड़ा रोड टर्निंग पर सुबह के समय की है. मृतक का नाम शिवांगी नगर, हुडकेश्वर रोड, नागपुर निवासी देवराव शामरावजी घरजाले (55) है. सभी आरोपियों को न्यायालय में पेश किया, जहां से उनको 12 सितंबर तक पुलिस रिमांड में भेजा गया है. जानकारी अनुसार रविवार को सुबह करीब 9 बजे मृतक घरजाले यह अपने रिश्तेदार नारायण भेंडे के अंतिम संस्कार में शामिल होने के लिए मौजा कुसुंबी जाने के लिए अपने दोपहिया वाहन क्रं. एमएच 49/ डब्ल्यू 4889 से निकले.



लेकिन, कुछ ही देर बाद परिवार को किसी ने फोन करके बताया कि उमरगांव से पांढरकवड़ा मार्ग की मोड़ पर देवराव घरजाले की लाश पड़ी है. मृतक घरजाले की गर्दन पर धारदार हथियारों से गहरे घाव थे. गला भी आधा कटा हुआ था. दायी आंख भी फोड़ी हुई थी, सिर, चेहरे, कान, दोनों कंधे, छाती पर और पेट पर तथा पीठ पर अनेक जगहों पर वार किये गये. इस क्रूर हमले में घरजाले की मौके पर ही मौत हो गई थी. इस हाथापायी में आरोपी मुक्तेश्वर मेश्राम भी जख्मी हो गया, जिसका उपचार नागपुर के मेडिकल अस्पताल में चल रहा है.

### 12 सितंबर तक PCR

घटना की सूचना मिलते ही कुही पुलिस और स्थानीय अपराध शाखा की टीम मौके पर पहुंची और 4 घंटे के भीतर ही एलसीबी की टीम ने इस हत्याकांड में शामिल चार आरोपियों को गिरफ्तार कर लिया. गिरफ्तार आरोपियों में पीपला हुडकेश्वर, नागपुर निवासी अंकित संजय येलणे, दुबेनगर, पीपला,हुडकेश्वर नागपुर निवासी मुक्तेश्वर ज्ञानेश्वर मेश्राम (40), पीपला हुडकेश्वर निवासी गजानन नामदेवराव कडु और दुधाला तह. मौदा जि.नागपुर निवासी गणेश गंगाराम हुड का समावेश है. यह कार्रवाई एलसीबी के पुलिस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे के मार्गदर्शन में सहा.पुलिस निरीक्षक किशोर शेरकी व मनोज गदादे, पुलिस उपनिरीक्षक बट्टूलाल पांडे, विनोद काले, आशीष भुरे, मयूर ढेकले, प्रमोद भोयर, सत्यशील कोठारे, विपिन गायधने, संजय बरोडिया, धोंडूतात्या देवकते, मनीष नेवारे, साइबर सेल के मृणाल राऊत, विनोद कोठे, राहुल पाटिल, सुमित बांगरे ने की.



### आर्थिक लेन देन और प्रॉपर्टी का विवाद

पुलिस सूत्रों के मुताबिक मृतक ने मृतक आरोपी अंकित संजय येलणे का मौसा था. मृतक घरजाले प्रॉपर्टी डिलिंग के व्यवसाय में पार्टनर थे. इसके अलावा वे न्यू नागपुर महिला ग्रामीण विकास सह. पत संस्था में बतौर मैनेजर के रूप में कार्यरत थे. बताया जाता है मृतक ने आरोपी अंकित के माता-पिता से धोखे से यह संस्था हड़पी थी और अंकित के घर के पीछे एक प्लाट है जिसे लेकर इनमें विविद चल रहा था. दोनों परिवारों में करीब 3 करोड़ के आर्थिक लेने देन को लेकर भी विवाद भी चल रहा था.